## महत्त्वाचे

### नगर महाविद्यालयाचे बीसीए परीक्षेत यश

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–** पुणे विद्यापीठाच्या अलीकडे घेण्यात आलेल्या अंतिम वर्ष बीसीए (सायन्स) परीक्षेत नगर महाविद्यालयाच्या टीवायबीसीए सायन्स विभागातील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल केले आहे. विभागातील प्रथम चार विद्यार्थ्यांनी ९०.९ गुण सरासरी मिळवून उच्च गुणवत्तेचा दर्जा सिद्ध केला. विद्यार्थ्यांमध्ये निकिता भांगे, जिया तुषार पाटील, आयेशा मतीन शेख व विवेक संतोष धावळे यांनी ९०. ९ टक्के गुण मिळवत महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविला आहे. या यशाच्या निमित्ताने महाविद्यालयाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्राभारी प्राचार्य डॉ. नोएल पारगे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत सांगितले, शिस्तबद्ध अभ्यास, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि महाविद्यालयाच्या शैक्षणिक वातावरणाचा फायदा घेत विद्यार्थ्यांनी यश मिळवले आहे.

### मल्लखांब राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र मल्लखांब असोसिएशनच्या वतीने नुकतेच ठाणे येथे निवड चाचणी स्पर्धा उत्साहात पार पडली. या स्पर्धेत राज्यातील विविध जिल्ह्यांतील अनेक स्पर्धक खेळाडूंनी आपले कौशल्य सादर केले. या स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करून अहिल्यानगर खेळाडू ओम घन:श्याम सानप याची खेलो इंडिया बीच गेम्स राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड करण्यात आली आहे. ही स्पर्धा दमन येथे पार पडणार आहे. सानप हा अहमदनगर जिल्हा मल्लखांब असोसिएशन व एमएमवायटीसी क्लबचा कुशल खेळाडू असून त्याने याआधी शालेय राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये दोन वेळा रौप्य पदक मिळवून आपली चमक दाखवली आहे. प्रशिक्षक उमेश झोटिंग, प्रणिता तरोटे आणि आप्पा लाढाने यांच्या मार्गदर्शनाखाली नियमित सराव करत आहे.

### संयोजकपदी निशांत दातीर

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–** भाजपच्या वतीने राज्यभर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्ताने वर्षभर विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. या विषयावर नुकतीच मुंबई येथील राज्यस्तरीय बैठक झाली असून या बैठकीत अहिल्यनगर येथील संयोजन समितीमध्ये निशांत दातीर व अनिल ढवण यांनी निवड करण्यात आली आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्ताने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी निर्माण केलेले घाट, बारव, मंदिर व त्यांची स्मारक स्वच्छता अभियान, अहिल्यादेवी यांच्या जीवनावरील चित्र रथ, शोभा यात्रा महिला मेळावे, युवा मेळावे, महिला मॅरेथॉन, पथनाट्य वकृत्व स्पर्धा, निबंध लेखन, अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्यावर आधारित सामाजिक महिला व सोशल मीडियातील प्रभावी व्यक्तीचे संमेलन आदी कार्यक्रम हाती घेण्यात येणार आहेत. भाजपच्या प्रदेश स्तरावरून या सर्व कार्यक्रमांना प्रमुख वक्ते व मार्गदर्शन करण्यासाठी विविध मान्यवरांची निवड करण्यात आली असून त्यांच्याशी समन्वय साधून शहरात सर्व मंडलात विविध उपक्रम राबविण्याची जबाबदारी निशांत दातीर व अनिल ढवण यांच्यावर आहे.

### गुणे आयुर्वेदमध्ये रक्तदान शिबीर

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–** विज्ञानाची प्रगत तरी अद्याप रक्त तयार करता येत नाही. यामुळे रक्ताची गरज ही केवळ रक्तदानानेच पूर्ण होऊ शकते. त्यामुळे नागरिकांनी वर्षातून २ ते ३ वेळा रक्तदान करून कर्तव्य पार पाडावे. गुणे आयुर्वेद रुग्णालयात रक्ताची कमतरता भरून काढण्यासाठी शिबिराचे आयोजन करून कौतुकास्पद उपक्रम राबवला आहे, असे प्रतिपादन आयुर्वेद शास्त्र सेवा मंडळाचे सहसचिव सचिन जगताप यांनी केले. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ व गंगाधरशास्त्री गुणे आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालयात, मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रक्तदान शिबिराचे उद्घाटन जगताप यांनी केले. यावेळी संस्थेचे मानद सचिव डॉ. विजय भंडारी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय लोडे, उपप्राचार्य डॉ. सुरज ठाकूर आदींसह प्राध्यापक व रक्तदान करणारे विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष अहिल्यानगरचे समन्वयक डॉ. नीलकांत ठाकरे, डॉ. रुपाली म्हसे, डॉ. शिनगारे, डॉ. उत्क्रांती सलगरे, डॉ. जोशी, सुशील बजास, सत्यनारायण झंवर, चंद्रकांत औशीकर आदींसह प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

### सावकाराच्या घरासमोर शेतकऱ्याने घेतले विष

**पारनेर (तालुका प्रतिनिधी)–** तालुक्यातील जामगाव येथील बाजीराव धोंडीभाऊ बांगर (रा. जामगाव, ता. पारनेर) या शेतकऱ्याने खासगी सावकाराच्या जाचाला कंटाळून सावकाराच्या घरासमोर विष घेऊन जीवन संपविण्याचा प्रयत्न केला. बुधवारी (दि. १४) सायंकाळी ही घटना घडली.

शेतकऱ्याला नातेवाईकांनी भाळवणी येथील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. त्याची प्रकृती स्थिर आहे. खासगी सावकारावर कारवाई करण्याची मागणी बांगर कुटुंबियांनी गुरुवारी जिल्हा पोलीस अधीक्षकांसह जिल्हा उपनिबंधकांकडे निवेदनाद्वारे केली आहे. २०१९ मध्ये जामगाव येथील शेतकरी बाजीराव बांगर यांनी खासगी सावकाराकडून १० टक्के व्याजदराने ५ लाख रुपये १ वर्षासाठी घेतले होते. यापैकी काही पैसे व्याजासह एका पतसंस्थेमधील सावकाराच्या खात्यावर २०२० मध्ये ३ लाख, तर २०२३ मध्ये १३ लाख १६ हजार २५० रुपये वेळोवेळी भरले. त्याची पावतीही आहे. तरीही सावकाराकडून ६ लाख ५० हजार रुपयांची मागणी केली जात आहे. सावकाराने बांगर कुटुंबियांना वेळोवेळी त्रास देऊन जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या, असे निवेदनात नमूद केले आहे. सावकाराकडून घेतलेल्या रकमेपेक्षा तीन पट अधिक रक्कम दिली असतानाही आर्थिक व मानसिक छळ केला जात असल्याचा आरोप बांगर कुटुंबियांनी केला आहे. तरी या खासगी सावकाराची चौकशी करून आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी व सावकारकीचा गुन्हा दाखल करावा, जामगाव येथील या सावकाराच्या विरोधात आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करावा, या मागणीसाठी पारनेर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यासाठी संबंधित शेतकऱ्याची मुले संकेत आणि सुरज गेले होते. सावकाराच्या दबाव व दहशतीमुळे पोलिसांनीच त्या दोघांना बेकायदा तुरुंगात डांबले, असा आरोप बांगर कुटुंबियांनी केला आहे, असेही निवेदनात म्हटले आहे. दरम्यान, हा प्रकार जमीन खरेदी-विक्री व्यवहारातून झाल्याचे पारनेर पोलिसांनी सांगितले आहे.

### जिजामाता स्कूलचे यश

**पारनेर (तालुका प्रतिनिधी)–** येथील आनंद मेडिकल अ‍ॅण्ड एज्युकेशनल फाउंडेशनच्या जिजामाता सेमी इंग्लिश स्कूलच्या दहावीच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश मिळवले आहे. सानिका रेपाळे, यश बोरुडे यांनी ८६.४० टक्के गुण मिळवत संयुक्तपणे प्रथम क्रमांक मिळविला. श्रद्धा रेपाळे ८३.६० टक्के द्वितीय, श्रुतिका शिंदे ८३.२० टक्के तृतीय, कार्तिकी जगताप ७९ टक्के चतुर्थ तर राखी दिवटे ७८ टक्के गुण मिळवत पाचवा क्रमांक मिळविला. यशस्वी विद्यार्थ्यांना संतोष ठाणगे, नंदा चेडे, सोपान गवते, सुनंदा घुले, सारिका वाघमारे या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थी व शिक्षकांचे संस्थेचे सचिव डॉ. सादिक राजे, डॉ. रफिक सय्यद, विश्वस्त फहाद राजे यांनी अभिनंदन केले आहे.

# पैसे परत घेण्यासाठी गुंतवणूकदारांचा एजंटांकडे तगादा

## मल्टिपर्पज अर्बन निधी लिमिटेड कंपनी फसवणूक प्रकरण

- मल्टिपर्पज अर्बन निधी लिमिटेड कंपनीकडून मुद्दल परत मिळत नसल्याने फसवणूक झालेले गुंतवणूकदार हवालदिल झाले आहेत. कंपनीकडून वेगवेगळी कारणे सांगून वेळ मारुन नेण्यात येत आहे. दुसरीकडे, आकर्षक कमिशनाच्या प्रलोभनामुळे एजंटांनी कोटयवधींच्या ठेवी कंपनीकडे जमा केल्या. त्यांना आता संतप्त झालेल्या गुंतवणूकदारांच्या रोषाला सामोरे जावे लागत आहे.

**श्रीगोंदा (तालुका प्रतिनिधी)** – शेअर मार्केटमध्ये जास्त परतावा मिळवून देण्याचे आमिष दाखवून श्रीगोंदा, पारनेर, नगरसह राज्याच्या अनेक भागात एका मल्टिपर्पज अर्बन निधी लिमिटेड कंपनीने गुंतवणूकदारांची कोट्यवधींची फसवणूक करत गाशा गुंडाळला आहे. त्यामुळे फसवणूक झालेले धास्तावले असून त्यांनी व्याज नको फक्त मुद्दलच परत द्या, असा तगादा एजंटांकडे सुरु केला आहे. त्यामुळे एजंटांच्या अडचणी वाढल्या आहेत. गुंतवणूकदारांनी कंपनी संचालकांची भेट घेतली असता १५ जूननंतर पैसे मिळण्यास सुरुवात होईल असे सांगण्यात आल्याचे समजते. दरम्यान, व्हॉटसअ‍ॅप ग्रुपवर गुंतवणूकदारांची कंपनीबाबत उलटसुलट चर्चा रंगली आहे.

कंपनीकडून गुंतवणूकदारांना पैसे परत मिळत नसल्याने ते कंगाल झाले आहेत. दुसरीकडे गुंतवणूकदारांच्याच पैशातून कंपनीकडून मिळालेल्या कमिशनमुळे एजंट मालामाल झाले आहेत. त्यांनी अलिशान गाड्या, बंगले, जमिनी, प्लॉटमध्ये आपल्या आणि कुटुंबाच्या नावाने कमिशनच्या पैशांची गुंतवणूक केली आहे. एजंट, व्यवसाय भागीदारांना



भरघोस कमिशनसह देश-विदेशात सहलीला नेऊन आणले. जास्त पैसे गुंतवणूक करणाऱ्यांना कंपनीने दुबई, गोव्याची सहल घडवली पण त्यांच्यासह इतर गुंतवणूकदारांना केवळ श्रीमंत होण्याचे स्वप्नच दाखविले. आता, मात्र गुंतवणूकदारांनी तगादा लावल्याने एजंटही अडचणीत आहेत.

एका मल्टिपर्पज अर्बन निधी लिमिटेड कंपनीने सुरुवातीला गुंतवणूकदारांना शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतवले असल्याचे सांगत ठेवीवर महिन्याला १० ते १२ टक्के व्याज देण्याचे आमिष दाखवले. महिन्याला लाख रुपयांना दहा ते बारा हजार परतावा देवून विश्वास संपादन केला. त्यामुळे कंपनीत गुंतवणूकदारांची रीघ लागली. कुणी पदरचे पैसे गुंतवले, कुणी जास्त परतावा मिळतो म्हणून कर्ज काढले, जमिनी,जागा विकून पैशांची गुंतवणूक केली. वेळप्रसंगी सावकार, बँकेकडून कर्ज काढून कंपनीमध्ये पैसे गुंतवले. अनेकांनी कोट्यवधी रुपयांच्या ठेवी कंपनीकडे जमा केल्या त्यासाठी एजंट आणि व्यवसाय भागीदारांना भरघोस कमिशन देण्यात आले.

आता, शेअर बाजार, जादा परतावा आणि ग्लोबल ट्रेडिंग असे वेगवेगळे फंडे वापरुन गुंतवणूकदारांची दिशाभूल करणाऱ्या कंपनीने गाशा गुंडाळला आहे. गेल्या दोन महिन्यांपासून वारंवार मागणी करुनही कंपनीकडून गुंतवणूकदारांना पैसे मिळत नसल्याने अनेकजण धास्तावले आहेत.

# कोतवालीचे दराडे सर्वोत्तम पोलीस निरीक्षक

## मुख्यमंत्री कृती कार्यक्रम योजनेचा निकाल जाहीर

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)** – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलेल्या कृती कार्यक्रम योजनेचा निकाल जाहीर झाला आहे. नाशिक विभागामध्ये पोलीस निरीक्षक संवर्गामध्ये सर्वोत्तम निरीक्षक म्हणून अहिल्यानगरच्या कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांनी व्दितीय क्रमांक पटकावला आहे.

१०० दिवस सुधारणा कार्यक्रमांतर्गत करावयाच्या कामांबाबत पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी सातत्याने मार्गदर्शन करून आढावा घेत पोलीस दलाच्या अंतर्गत येणाऱ्या विविध कार्यालयांना, पोलीस ठाण्यांना सुधारणा कार्यक्रमांतर्गत विविध उपक्रम राबविण्याबाबत सूचना केल्या होत्या.

त्या अनुषंगाने कार्यालयीन सुधारणा, स्वच्छता, तक्रार निवारण, सुलभजीवनमान तसेच तंत्रज्ञानाचा वापर करून आवश्यक त्या सुविधा व उपाययोजना करणेबाबत उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल उपविभाग स्तरावर कोतवाली पोलीस स्टेशन दुसऱ्या क्रमांकावर सर्वोत्तम ठरले आहे. प्रथम क्रमांक जळगाव जिल्ह्यातील एमआयडीसी पोलीस स्टेशनचा तर तृतीय क्रमांक धुळे जिल्ह्यातील पश्चिम देवपूर पोलीस स्टेशनचा आला आहे.

कोतवाली पोलीस स्टेशनचे पोलीस स्टेशनचे निरीक्षक प्रताप दराडे म्हणाले, लोकांना पासपोर्टची सेवा शंभर टक्के वेळेत पुरवणे, चारित्र्य पडताळणी सेवा वेळेत देणे यासह स्वच्छता उपक्रम, जुने मुद्देमाल निर्गती करणे, रेकॉर्ड अद्ययावत करून जुना रेकॉर्ड नष्ट करणे यासह कर्मचारी व अधिकाऱ्यांचे वेळोवेळी प्रशिक्षण घेऊन त्यांना प्रशिक्षित करणे हे काम आम्ही या १०० दिवसांच्या आत यशस्वीरित्या पूर्ण करून दाखवले.

पोलीस स्टेशन अंतर्गत व परिसरातील वेळोवेळी स्वच्छतेला महत्त्व देऊन पोलीस स्टेशन स्वच्छ व सुंदर राहील याकडे लक्ष दिले. पोलीस स्टेशन हे अहिल्यानगर शहराच्या मध्यवर्ती भागात असल्यामुळे पोलीस अधीक्षक राकेश ओला, अतिरिक्त पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे व उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती हे वेळोवेळी तपास कामानिमित्त आल्यानंतर त्यांचे नेहमी मार्गदर्शन मिळाल्याने आम्हाला कामांमध्ये प्रगती करता आली. म्हणून आज आम्हाला हा सन्मान मिळाला आहे, असेही पोलीस निरीक्षक दराडे यांनी सांगितले. या यशाबद्दल पोलीस निरीक्षक दराडे यांचे अभिनंदन होत आहे.

# गावठी कट्टा बाळगणारा जेरबंद

## ४२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

**श्रीगोंदा (तालुका प्रतिनिधी)** – स्थानिक गुन्हे शाखेने श्रीगोंदा येथे कारवाई करत गावठी कट्टा बाळगून विक्री करण्याचा प्रयत्न करणाऱ्याला शुक्रवारी (दि.१६) जेरबंद केले. या कारवाईत एक कट्टा, दोन जिवंत काडतुस असा ४२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

चंद्रशेखर जयवंत मखरे (वय ३८, रा.मखरेवाडी, ता.श्रीगोंदा, जि.अहिल्यानगर) असे अटक केलेल्याचे नाव आहे. पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी जिल्ह्यात अवैध अग्निशस्त्रे व हत्यारे बाळगणाऱ्या इसमांवर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. चंद्रशेखर मखरे गावठी कट्टा विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांना मिळाली. त्यानुसार पोलीस पथकाने हॉटेल विजय, पारगाव फाटा ते श्रीगोंदा जाणारे रोडवर सापळा रचला व मखरे याला कट्टा, दोन जिवंत काडतुसासह ताब्यात घेतले. याप्रकरणी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास पोलीस करीत आहेत. ही कारवाई पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार दत्तात्रय हिंगडे, भाऊसाहेब काळे, अमोल कोतकर, बाळासाहेब खेडकर, मेघराज कोल्हे व अरुण मोरे यांच्या पथकाने केली.

# डॉ. बोरगेप्रकरणी न्यायालयात हरकत घेणार

## आयुक्त डांगे यांची माहिती; उपस्थित केले विविध प्रश्न

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)** – आरोग्य विभागातील अपहार प्रकरणातील गुन्ह्यातून डॉ. अनिल बोरगे यांचे नाव वगळण्याबाबत पोलीस प्रशासनाने न्यायालयात दाखल केलेल्या पत्राला महानगरपालिकेमार्फत कायदेशीर हरकत व आक्षेप घेतला जाणार आहे. गुन्ह्यातून त्यांचे नाव वगळण्याचा निर्णय अद्याप न्यायालयाने दिलेला नाही. याप्रकरणी महानगरपालिका न्यायालयात योग्य ती भूमिका मांडेल, अशी माहिती आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिली आहे.

दरम्यान, डॉ. बोरगे यांनी स्वतःच हा अपहार उघड केल्याचा दावा ते करत असतील, तर आरोग्य विभागाचे जबाबदार अधिकारी व विभागप्रमुख म्हणून त्यांनी गुन्हा का दाखल केला नाही? अद्याप अपहरणाची रक्कम वसूल का झाली नाही? डॉ. बोरगे यांनी दीड वर्ष यावर मौन का बाळगले? त्यांना आत्ताच पश्चातापबुद्धी कशी सुचली? असे सवालही आयुक्त डांगे यांनी उपस्थित केले आहेत. आरोग्य विभागातील १६.५० लाखांच्या अपहार प्रकरणी पोलिसांनी तपास करून त्यात डॉ. बोरगे यांच्या विरोधात पुरावे नसल्याचे म्हटले आहे. प्रत्यक्षात खात्यातील व्यवहाराबाबत दोघांची जबाबदारी आहे. निधी वापराबाबत तत्कालीन शहर लेखा व्यवस्थापक विजयकुमार रणदिवे याने निधी वर्ग करण्याबाबत त्यांच्या यूजर आयडीवरून केलेल्या कार्यवाहीला अथवा प्रस्तावाला विभाग प्रमुख म्हणून डॉ. बोरगे यांनी त्यांच्या आयडीवरून मंजुरी दिल्यावर खात्यावरील व्यवहार होणे अपेक्षित आहे. मात्र, बोरगे यांनी यात विभागप्रमुख म्हणून निष्काळजीपणा व हलगर्जीपणा केला आहे. रणदिवे यानेच दोन्ही युजर आयडी वापरून पैसे वर्ग केले. यावरून विभागप्रमुख म्हणून बोरगे यांचे कोणतेही नियंत्रण नव्हते व त्यांनीच दोन्ही आयडी वापरायला दिल्याचे दिसते व हे संगनमतच असल्याचा दावा डांगे यांनी केला आहे.

# मंगल कार्यालयातून नववधूंचे दागिने चोरीला

## जामखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

### सीसीटीव्ही बसविण्याची मागणी

- मंगल कार्यालयातील लग्न समारंभात गर्दीचा फायदा घेत चोरटे सोन्याचे दागिने चोरी करुन हात साफ करतात. विशेष म्हणजे लग्नकार्यास येणाऱ्या लोकांच्या दुचाकी देखील चोरटे चोरुन नेत असल्याच्या घटना घडल्या आहेत. जामखेड तालुक्यातील सर्व मंगल कार्यालयांत सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावेत, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

**जामखेड (तालुका प्रतिनिधी)** – येथील मंगल कार्यालयातून नववधूंसाठी आणलेले ७५ ग्रॅम वजनाचे पावणेचार लाख रुपये किमतीचे सोन्याचे दागिने बुधवारी (दि.१४) अज्ञात चोरट्याने चोरुन नेले. याप्रकरणी प्रताप कल्याण काकडे (रा. बोर्ले, ता. जामखेड) यांच्या फिर्यादीवरुन जामखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी अधिक माहिती अशी, फिर्यादी काकडे यांच्या दोन मुलांचे लग्न जामखेड तालुक्यातील राजेवाडी येथील मातोश्री मंगल कार्यालय येथे बुधवारी होते. लग्न लागल्यानंतर सप्तपदीचा कार्यक्रम होणार होता. दुपारी चार वाजण्याच्या सुमारास सोन्याचे दागिने ठेवलेला स्टीलचा डबा लग्नाचे साहित्य ठेवले होते त्या ठिकाणी ठेऊन काकडे लघुशंकेसाठी गेले. परत आल्यानंतर त्यांना डबा जागेवर दिसून आला नाही. त्यांनी नातेवाईकांकडे चौकशी केली मात्र सोने ठेवलेला डबा सापडला नाही. डबा चोरी झाल्याचे समजताच काकडे यांनी जामखेड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. पुढील तपास पोलीस निरीक्षक महेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हेड कॉन्स्टेबल संजय लोखंडे करीत आहेत.

# अहिल्यादेवींचे कार्य नव्या पिढीपर्यंत नेणार

## अ‍ॅड. आगरकर : शहर भाजपाच्यावतीने विविध कार्यक्रम

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)** – पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दीनिमित्त नगर शहर भाजपच्यावतीने भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांचे कार्य नव्या पिढीपर्यंत नेण्यासाठी तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती शहर भाजप जिल्हाध्यक्ष अ‍ॅड. अभय आगरकर यांनी दिली आहे.

नगरमध्ये शनिवारी झालेल्या बैठकीच्या स्थानावरून अ‍ॅड. आगरकर बोलत होते. यावेळी सुनील रामदासी, प्रशांत मुथा, प्रिया जानवे व पदाधिकारी उपस्थित होते. या बैठकीत सावेडी मंडल अध्यक्ष ज्ञानेश्वर काळे, भिंगार मंडल अध्यक्ष सचिन जाधव, केडगाव मंडल अध्यक्ष भरत ठुबे, मध्यमंडल अध्यक्ष मयूर बोचूघोळ यांचा सत्कार करून अभिनंदन करण्यात आले.

बैठकीचे प्रास्ताविक मुथा यांनी केले. यावेळी बाबासाहेब सानप, बाळासाहेब भुजबळ, अनिल निकम, बाळासाहेब गायकवाड, सचिन पळशीकर, प्रकाश जोशी, देवेंद्र बंब, अविनाश वाणी, ज्ञानेश्वर धिरडे, दत्ता गाडळकर, सुधीर मंगलारप, गोपाल वर्मा, राखी आहेर, कालिंदी केसकर, मयूर ताठे, अरुण शिंदे, कैलास गर्जे, राजेंद्र फुलारे, सचिन कुसळकर, सुनील तावरे, सुहास पाथरकर, सुजित खरमाळे, सविता कोटा, संतोष शिरसाठ, रोहित पठारे, संपत नलावडे, पल्लवी जाधव आदी उपस्थित होते.

# पारनेरात आज ५ नवीन बसेसचे लोकार्पण

**पारनेर (तालुका प्रतिनिधी)** – राज्य परिवहन महामंडळाच्या पारनेर आगारासाठी ०५ नवीन बसेस देण्यात आल्याची माहिती आमदार काशिनाथ दाते यांनी दिली. आज सकाळी साडे आठ वाजता या बसेसचे लोकार्पण करण्यात येणार आहे. मागील वीस ते पंचवीस वर्षात पारनेर आगारासाठी एकही नवीन बस देण्यात आलेली नाही. जुन्या बस अनेकदा रस्त्यात बंद पडण्याचे प्रकार वाढले आहेत. त्यामुळे प्रवाशांची गैरसोय होत आहे, त्यामुळे पारनेर आगारासाठी २५ नवीन बसेस देण्यात याव्यात अशी मागणी निवेदनाद्वारे परिवहन मंत्री प्रतापराव सरनाईक यांच्याकडे आ. दाते यांनी केली होती. या मागणीची दखल घेऊन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी नवीन १० बसेस मंजूर केल्या असून ५ बसेस दिल्या आहेत. आणखी ५ बसेस लवकरच आगाराला प्राप्त होणार आहेत. दरम्यान, आणखी १५ बसेससाठी तसेच पारनेर व सुपा आगाराच्या विस्तारीकरणासाठी शासन दरबारी पाठपुरावा सुरु आहे, त्यालाही लवकरच यश मिळेल,असे आमदार दाते म्हणाले.

# कत्तलीसाठी डांबून ठेवलेल्या १७ जनावरांची सुटका

**कर्जत (प्रतिनिधी)** – स्थानिक गुन्हे शाखेने तीन ठिकाणी छापेमारी करत कत्तलीसाठी डांबून ठेवलेल्या १७ गोवंशीय जनावरांची सुटका केली आहे. कर्जत शहरात शनिवारी (दि.१७) ही कारवाई करण्यात आली. मुन्ना हुसेन कुरेशी (रा.कुरेशी मोहल्ला, कर्जत) आतीक कुरेशी, निसार कुरेशी (पुर्ण नाव माहित नाही, दोन्ही रा.कर्जत), अशोक बाजीराव लोंढे (रा.थेरवाडी, ता.कर्जत), शोएब कुरेशी (रा.कर्जत) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कर्जत शहरात तीन वेगवेगळ्या ठिकाणी कत्तलीसाठी जनावरे डांबून ठेवले असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पंचासमक्ष छापे टाकले असता गोवंशीय जनावरे कत्तलीसाठी डांबून ठेवल्याचे आढळून आले. या प्रकरणी कर्जत पोलीस ठाण्यात तीन गुन्हे दाखल करण्यात आले असून २ लाख १५ हजार रुपये किंमतीचे १७ गोवंशीय जनावरे ताब्यात घेण्यात आली आहेत.

ही कारवाई पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार अतुल लोटके, गणेश धोत्रे, शाहीद शेख, सोमनाथ झांबरे, रोहित मिसाळ, आकाश काळे, भाऊसाहेब काळे, बाळासाहेब गुंजाळ, मनोज लातुरकर, उमाकांत गावडे व अरुण मोरे यांच्या पथकाने केली.

# धनादेश अनादरप्रकरणी बिल्डरला तीन महिने कारावास

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)** – प्लॉट खरेदी व्यवहारात दिलेला धनादेश अनादर झाल्याप्रकरणी न्यायालयाने शहरातील बिल्डरला तीन महिन्यांचा सश्रम कारावास व १३ लाख रुपये नुकसान भरपाई देण्याची शिक्षा सुनावली. राजनंदिनी डेव्हलपर्स बिल्डर्स अ‍ॅण्ड कन्स्ट्रक्शनचे राहुल मच्छिंद्र ससाणे (रा. कोर्ट गल्ली, नालेगाव, अहिल्यानगर) असे या बिल्डरचे नाव आहे. राहुल ससाणे यांनी स्मिता राहुल काची उर्फ स्मिता राठोड यांचेकडून २०२१ मध्ये प्लॉट खरेदी केला होता. प्लॉट खरेदी व्यवहारापोटी दिलेला धनादेश वटला नाही. त्यामूळे ससाणे यांनी पुन्हा दुसरा धनादेश दिला होता. तो धनादेश देखील अनादर झाल्याने फिर्यादी काची यांनी ससाणे यांना वकीलांमार्फत नोटीस पाठविली. परंतु ससाणे यांनी फिर्यादीला धनादेशाची पूर्ण रक्कम दिली नाही. त्यामुळे फिर्यादी काची यांनी ससाणे यांच्या विरूद्ध न्यायालयात फिर्याद दाखल केली होती. त्या खटल्यात फिर्यादीतर्फे अ‍ॅड. सुहास टोणे यांनी युक्तिवाद केला. यावेळी सादर केलेला पुरावा व साक्षीदारांची साक्ष ग्राह्य धरून न्यायालयाने ससाणे यांना शिक्षा सुनावली आहे.

# सहा गोवंशीय जनावरांची सुटका; गुन्हे शाखेची कारवाई

## झेंडीगेट कत्तलखान्यावर छापा; ४०० किलो गोमांस जप्त

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–** झेंडीगेट, येथील कत्तलखान्यावर स्थानिक गुन्हे शाखेने छापा टाकून ४०० किलो गोमांस जप्त केले. या कारवाईत २ लाख ६० हजार २०० रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली गणेश भिंगारदे, संतोष खैरे, बाळासाहेब नागरगोजे, अशोक लिपणे, शिवाजी ढाकणे, भगवान थोरात यांनी ही कारवाई केली.

कुरेशी (रा.झेंडीगेट) याने त्याच्या राहत्या घराजवळ काही इसमांच्या मदतीने गोवंशी जातीची जनावरे कत्तल करण्यासाठी आणली आहेत. पथकाने पंचासमक्ष छापा टाकला असता, तीन इसम गोवंशीय जनावरांची कत्तल करताना दिसून आले. तसेच आजूबाजूला काही जिवंत गोवंशीय जनावरे डांबून ठेवलेले होते. पथकाने छापा टाकून कारवाई करताना एक इसम पळून गेला. सलीम मुसा शेख (वय ३०, रा.कोठला, घासगल्ली), जहीद समद कुरेशी (वय २०, रा. व्यापारी मोहल्ला) अशी दोघांची नावे सांगितली. ताब्यातील आरोपीस पळून गेलेल्या इसमाचे नाव विचारले असता त्याचे नाव असिफ कुरेशी (रा. व्यापारी मोहल्ला, झेंडीगेट) असे सांगितले. पोलिसांनी आरोपींना ताब्यात घेतले असून गोवंशाची सुटका केली आहे.